आर.सी.सी.क्र.४३६/२०२२
**नि.१५**

**सरकारतर्फे सा.क्र.१**
मी या व्दारे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की
माझे नांव : उषा उध्दव आव्हाड,
वय : ३० वर्षे, धंदा : शेती,
राहणार : राजेगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**सरतपास सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एच.चव्हाण यांचे मार्फत** -

माझे घरामध्ये मी, माझे पती, मुलगी आणि मुलगा असे राहतो. घटना दि. २७/०६/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजेच्या दरम्यान अंबादास घुले यांच्या घरासमोर घडली होती. त्यावेळी मी शेतातून घरी निघाले होते. अंबादास घुलेच्या घरासमोरुन जात असताना पांडुरंग घुले माझे मुलीला चिडवत होता. त्यावेळी मी त्याला म्हणाले की, ती लहान मुलगी आहे तिला का चिडवतो. त्यावर गणेश घुले तेथे आला आणि म्हणाला ''काय बोलायचे आहे ते माझेशी बोल'' मी म्हणाले ''तुझा आणि माझा काहीएक संबंध नाही तु मध्ये कशाला बोलतो'' तो म्हणाला की ''मी कोण आहे तुला माहित नाही, मी भाई आहे'' त्यावर मी त्याला म्हणाले ''तु तुझे घरचा भाई मला काय करायचे'' असे म्हणाल्याचा त्याला राग आला. त्यानंतर मला कानामागे मारले, त्याचे हातातील कु-हाडीच्या दांडयाने माझे दंडावर मारले व बुक्की तोंडावर मारली आणि म्हणाला की ''तुला व तुझे नव-याला जिवंत मारुन टाकीन'' अशी जीवंत मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी माझे पतीला कामावरुन बोलवून घेतले. त्यानंतर आम्ही सोनई पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी गेलो. त्यादिवशी पोलिसांनी आम्हाला दुस-या दिवशी येण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही घटनेच्या दुस-या दिवशी सकाळी फिर्याद देण्यासाठी गेलो व फिर्याद दाखल केली. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **नि.१६** देण्यात येते. मला मारहाण केलेला लाकडी दांडा दाखवल्यास मी ओळखू शकते. आता मला पी.आर. नं. ११०/२०२२ दाखविण्यात आले. तो तोच दांडा आहे. तो दांडा मी यापुर्वी मला मारहाण करतेवेळी पाहिला होता. त्यास

**आर्टीकल अ** देण्यात येते. मी गणेश घुले यास पाहिल्यास ओळखू शकते. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड.पी.सी.नाहार यांचे मार्फत सुरु-</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटना ठिकाणी आजुबाजुला लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, अंबादास घुले याच्या घरासमोर शेतीची अवजारे पडलेली होती. सोनई ते राजेगाव अंतर १० ते १२ कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, राजेगाववरुन सोनईला जायचे असेल तर घोडेगांव या गावावरुन जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, घोडेगाव येथे बरीच हॉस्पीटलस आहेत. घटनेबाबत मी पोलीस पाटील यांना सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, २७ तारखेला कोठेही उपचार घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेली कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटने ठिकाणी आरोपी नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोठेही मारहाण व शिवीगाळ केलेली नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी दांडा हा अंबादास याचे घरासमोरुन जप्त केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार म्हातारदेव, सुदाम,उध्दव, वत्सला हे सर्व माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचे व आरोपीचे पुर्वीचे वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पतीने संगनमताने आरोपीविरुध्द फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलिसांनी फिर्यादीवर सही करण्यास सांगितले मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही त्यामुळे मी २७ तारखेला पोलीस स्टेशनला गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/-

**(ए.एन.सरक)**

दिनांक :१६/०३/२०२४

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.३ नेवासा